
# ZILLA PARISHAD NASHIK NEWSLETTER



## प्रेरणा व संकल्पना

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**

**श्री ओमकार नीलम मधुकर पवार**

**भा. प्र.से**

| Sr. No. | Event/Workshop |
| --- | --- |
| 1. | सुरगाणा तालुक्यात लंपी चर्मरोग नियंत्रणासाठी जिल्हा परिषदेची जलद कारवाई |
| 2. | मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न |
| 3. | जनसेतू" नागरिक व शासना मधील डिजिटल सेतू जिल्हा परिषदेचे अभिनव पाऊल |
| 4. | नाशिक ते नासा' – ग्रामीण विद्यार्थ्यांची ऐतिहासिक झेप आयआयटीत निवड झालेले सहा विद्यार्थी जाणार नासा |
| 5. | स्वच्छता ही सेवा अंतर्गत जिल्हयात श्रमदान मोहिमेचे आयोजन |
| 6 | हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' अभियानात नाशिक शिक्षण विभागाची ११०% उद्दिष्टपूर्ती |
| 7 | महिला बचतगटांच्या उद्योगांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा उत्साहवर्धक दौरा |
| 8 | नाशिक जिल्ह्यास 'आदीकर्मयोगी अभियान' अंतर्गत राज्यातील सर्वोत्तम कामगिरीचा सन्मान |
| 9 | मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत जिल्हास्तरीय कक्ष स्थापन |
| 10 | "माझी शाळा – माझा अभिमान उपक्रम" - उपक्रमास उदंड प्रतिसाद |
| 11 | पेठ येथे रेशीम उद्योगासाठी तुती लागवड कार्यशाळा संपन्न |
| 12 | जिल्हा परिषदेच्या वतीने दिव्यांग हक्क जागृती कार्यशाळेचे आयोजन |
| 13 | जिल्हा परिषदेच्या मालमत्तांना मिळणार युनिक आयडी क्रमांक |
| 14 | नाशिक जिल्यात कुपोषण मुक्तीच्या दिशेने 'पोषणदूत योजना' प्रभावीपणे अंमलबजावणी |

# ZILLA PARISHAD NASHIK NEWSLETTER

We as a Zilla Parishad Nashik, love to share the key news, achievements and highlights of the month. This newsletter will help to see the major works done by the ZP Nashik in the **September and October** month.

## SEPT - OCT MAJOR HIGHLIGHTS

### सुरगाणा तालुक्यात लंपी चर्मरोग नियंत्रणासाठी जिल्हा परिषदेची जलद कारवाई

सुरगाण्यात गोवर्गीय जनावरांमध्ये लंपीसदृश लक्षणे दिसताच जि. प. पशुसंवर्धन विभागाने तात्काळ ३ जलद कृती दल नेमून गावोगावी तपासणी, उपचार व लसीकरण सुरू केले. आपत्कालीन स्वरूपात २,००० लसी डोस देण्यात आले असून ९ बाधित जनावरांवर उपचार आणि २८९ न लसीकरण झालेल्या जनावरांचे तातडीने लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे.






### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ४ सप्टेंबर २०२५ रोजी नाशिक येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पाणी फाउंडेशनचे डॉ. अविनाश पोळ आणि मान्याचीवाडीचे सरपंच रविंद्र माने यांच्या मार्गदर्शनाने ग्रामविकास, लोकसहभाग, स्वच्छता, जलसंधारण आणि शाश्वत विकास यावर प्रभावी चर्चा झाली.

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान : उमेद नाशिक राबवणार 'सक्षम सखी' उपक्रम - आरोग्य तपासणीतून अनेमिया मुक्तीचा संकल्प

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नाशिकच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व बचत गटातील महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी आणि त्यांना रक्तक्षयमुक्त करण्यासाठी अनिमिया मुक्त बचतगट उपक्रम १७ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाद्वारे ग्रामीण महिलांच्या आरोग्य सक्षमीकरणाला नवे बळ मिळणार असून हा उपक्रम मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाशी संलग्नित आहे.






**जिल्हा परिषदेच्या CSR बैठकीत औद्योगिक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग**

## “जनसेतू” नागरिक व शासनामधील डिजिटल सेतू
## जिल्हा परिषदेचे अभिनव पाऊल : २२ सेवा आता WhatsApp वर उपलब्ध

ग्रामीण नागरिकांना डिजिटल पद्धतीने शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद नाशिकने जनसेतू हा अभिनव उपक्रम सुरू केला असून अधिकृत WhatsApp क्रमांक +91 7263061766 वरून ग्रामपंचायत, महिला व बालकल्याण आणि शिक्षण विभागांच्या २२ सेवा घरबसल्या मिळणार आहेत. मराठी-इंग्रजी दोन्ही भाषांत उपलब्ध या सेवांमुळे वेळ, श्रम आणि प्रवासाची बचत होऊन पारदर्शक, सुलभ व कार्यक्षम प्रशासनाचा लाभ नागरिकांना एका क्लिकवर मिळणार आहे

## 'नाशिक ते नासा’ – ग्रामीण विद्यार्थ्यांची ऐतिहासिक झेप
## आयआयटीत निवड झालेले सहा विद्यार्थी जाणार नासा व अमेरिका अभ्यास दौऱ्यावर

जिल्हा परिषदेच्या सुपर ५० उपक्रमातून आयआयटीत प्रवेश मिळवलेल्या सहा ग्रामीण विद्यार्थ्यांना नासा तसेच अमेरिकेतील प्रतिष्ठित संशोधन संस्थांना भेट देण्याची अनोखी संधी मिळाली आहे. आठवडाभर चालणाऱ्या या शैक्षणिक दौऱ्यात विद्यार्थी जागतिक विज्ञान-तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेणार असून, या संकल्पनेद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या क्षमतेला जागतिक पंख मिळणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या ‘नाशिक ते नासा’ या उपक्रमामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी नवी प्रेरणा निर्माण होत आहे.





**स्वच्छता ही सेवा अंतर्गत जिल्हयात श्रमदान मोहिमेचे आयोजन**

## हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' अभियानात नाशिक शिक्षण विभागाची ११०% उद्दिष्टपूर्ती

राज्य शासनाच्या हरित अभियानांतर्गत नाशिक जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने ७० हजार लक्ष्यांपेक्षा अधिक म्हणजे तब्बल ७७ हजार वृक्षलागवड करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा परिसरात झालेल्या या वृक्षलागवडीचे जिओ-टॅगिंग महाफॉरेस्टवर पूर्ण झाले असून ११०% यश मिळाले आहे.



## महिला बचतगटांच्या उद्योगांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा उत्साहवर्धक दौरा

मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी वनारवाडी येथील नवनाथ महिला बचतगटाच्या मशरूम निर्मिती प्रकल्पाला भेट देऊन उत्पादन प्रक्रियेची माहिती घेतली. तसेच ढकांबे ग्रामपंचायतीतील सर्वज्ञ महिला बचतगटाच्या कारली व बटाटा वेफर्स निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन केले. महिला बचतगटांच्या उद्योगांना प्रशासन व समाजाची साथ मिळाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळेल, असे त्यांनी यावेळी सांगितले.







**मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्याकडून निफाड येथील पूर परिस्थितीची पाहणी**






**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान**






**नाशिक जिल्ह्यास ‘आदीकर्मयोगी अभियान’ अंतर्गत राज्यातील सर्वोत्तम कामगिरीचा सन्मान**

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत जिल्हास्तरीय कक्ष स्थापन

जिल्हा परिषद नाशिकने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय अभियान कक्षाची स्थापना केली असून, त्याचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या हस्ते झाले. या कक्षाद्वारे १३८७ ग्रामपंचायतींना सातही घटकांवरील मार्गदर्शन, समन्वय व तांत्रिक सहाय्य मिळणार आहे. विकसित अहवाल प्रणालीमुळे सर्व ग्रामपंचायतींची प्रगती एका क्लिकवर पाहता येणार असून कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढणार आहे.



## “माझी शाळा – माझा अभिमान उपक्रम” – उपक्रमास उदंड प्रतिसाद ५८ हजार माजी विद्यार्थ्यांचा गौरव

जिल्हा परिषद नाशिकच्या शिक्षण विभागातर्फे राबविण्यात आलेल्या “माझी शाळा – माझा अभिमान” या उपक्रमास जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ३२४० शाळांमधून तब्बल ५८,९९५ माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत सुमारे ३ कोटी ४१ लाख रुपयांचे योगदान दिले. शाळा स्वच्छता, सुशोभीकरण, साहित्य देणगी असे उपक्रम घेण्यात आले असून शाळा व माजी विद्यार्थ्यांतील नाळ अधिक दृढ झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राज्यभरासाठी आदर्श ठरला आहे.







**जि.प. पदभरती : प्रतीक्षा यादीतील १७ उमेदवारांना आरोग्यसेवक पदी नियुक्ती आदेश प्रदान**

## पेठ येथे रेशीम उद्योगासाठी तुती लागवड कार्यशाळा संपन्न



सावळघाट येथे पेठ पंचायत समिती, कृषी विभाग आणि मनरेगा यांच्या संयुक्त विद्यमाने तुती लागवड कार्यशाळा पार पडली. रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी तुती लागवड, संगोपन ग्रह उभारणी आणि संबंधित योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा परिषदेने जिल्ह्यात १,००० एकर तुती लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून आतापर्यंत ३९४ एकरांवर लागवड पूर्ण झाली आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी केले.

## जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांची अचानक विभागांना भेट ऑनलाइन हजेरी प्रणाली नियमितपणे वापरण्याचे निर्देश

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी विविध विभागांना दिलेल्या अचानक भेटीत ऑनलाइन हजेरी ॲपवर अनुपस्थित असलेल्या ६ कर्मचाऱ्यांची नोंद घेऊन त्यांच्या एक दिवसाच्या वेतन कपातीचे निर्देश दिले. जिल्हा परिषदेत डिजिटल हजेरी प्रणाली अनिवार्य करण्यात आली असून पुढील काळात ती वेतनाशी जोडली जाणार आहे. सर्व विभागांनी दररोज हजेरी अहवाल तपासून शिस्तबद्ध, पारदर्शक आणि कार्यक्षम कामकाज सुनिश्चित करण्याचे आदेश सीईओ यांनी दिले.







**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व गाव तेथे अभ्यासिका उपक्रमाचा सविस्तर आढावा**

## जिल्हा परिषदेच्या वतीने दिव्यांग हक्क जागृती कार्यशाळेचे आयोजन



दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अन्वये प्रशासनात संवेदनशीलता वाढवण्यासाठी नाशिक जिल्हा परिषदेत वर्ग १ व २ अधिकाऱ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या कार्यशाळेत दिव्यांगांच्या हक्क, सुविधा, आरक्षण, तक्रार निवारण प्रणाली आणि UDID कार्डाच्या अंमलबजावणीबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दिव्यांगांसाठी अधिक उत्तरदायी व समावेशक प्रशासन उभारण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



## जिल्हा परिषदेच्या मालमत्तांना मिळणार युनिक आयडी क्रमांक पायाभूत सुविधांचे डिजिटायझेशनसाठी MH-UID उपक्रम सुरू

जिल्हा परिषदेच्या मालकीच्या सर्व सार्वजनिक पायाभूत सुविधा मालमत्तांना युनिक आयडी देण्यासाठी 'महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर UID (MH-UID)' उपक्रमांतर्गत प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या संकल्पनेनुसार या उपक्रमामुळे सर्व मालमत्तांचे डिजिटायझेशन, GIS मॅपिंग आणि प्रभावी व्यवस्थापन शक्य होणार आहे. MRSAC तज्ज्ञांनी मालमत्ता नोंदणी, युनिक आयडी निर्मिती आणि डिजिटल ट्रॅकिंग प्रक्रियेचे मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील सर्व सार्वजनिक मालमत्तांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक, अचूक आणि शास्त्रीय पद्धतीने होणार आहे.

## नाशिक जिल्यात कुपोषण मुक्तीच्या दिशेने 'पोषणदूत योजना' प्रभावीपणे अंमलबजावणी; जिल्यातील 97 बालके 'नॉर्मल' श्रेणीत!



नाशिक जिल्ह्यात कुपोषण निर्मूलनासाठी राबविल्या जाणाऱ्या पोषणदूत योजने'मुळे लक्षणीय प्रगती होत असून, जिल्ह्यातील ९७ बालके 'नॉर्मल' श्रेणीत परतली आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली असून, आरोग्य, ICDS व स्थानिक यंत्रणांनी समन्वयाने घरभेटी, पोषणपूरक आहार वितरण आणि नियमित आरोग्य तपासण्या प्रभावीपणे राबवल्याचे यातून दिसून आले. या उपक्रमामुळे कुपोषणमुक्त नाशिकच्या दिशेने जिल्हा वेगाने पुढे जात आहे.